# किसन वीर सातारा सहकारी साखर कारखाना लि., भुईंज

किसनवीरनगर, ता. वाई, जि. सातारा (महाराष्ट्र)

जा.क्र.एडीएम/वार्षिक स.स./२०२१-२२/११७५ दिनांक-१/९/२०२१

## अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

किसन वीर सातारा सहकारी साखर कारखाना लि.,भुईंज, किसनवीरनगर ता.वाई, जि.सातारा या संस्थेची सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा कारखान्याचे मा.चेअरमन यांचे अध्यक्षतेखाली **गुरुवार दिनांक-३०/९/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता** कारखान्याचे कार्यस्थळावरुन कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर व शासनाच्या आदेशानुसार ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे खालील विषयांवर विचार करणेसाठी बोलविण्यात आली आहे. तरी कृपया सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती.

### * विषय पत्रिका *

१) दिनांक-३१/३/२०२१ रोजी झालेल्या एकोणपन्नासाव्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.

२) सन २०२०-२१ या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.

३) सन २०२०-२१ या वर्षाचा ताळेबंद व नफा तोटा पत्रके स्विकारणे व त्यास मंजूरी देणे.

४) वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला सन २०२०-२१ या वर्षाचा हिशोब तपासणी अहवाल व त्यावर तयार केलेला दोष दुरूस्ती अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.

५) सन २०२१-२२ या वर्षासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकास तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

६) सन २०२१-२२ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविणे.

७) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे आदेशावरुन कारखान्याच्या सभासद भागाचे दर्शनी मुल्य रु.१०,०००/- वरून रु.१५,०००/-करणे व त्यानुसार पोटनियमामध्ये दुरुस्ती करणेबाबत संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीवर विचार करणे.

८) सन २०२१-२२ या वर्षासाठी सभासद/बिगर सभासदांच्या साखर वाटपाच्या धोरणास मान्यता देणे.

९) संस्थेच्या सभासदांची अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस असणारी अनुपस्थिती क्षमापित करणे.

१०) मा.अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन

किसनवीरनगर ए. एम. शिंदे

दि. २६/८/२०२१ प्र. कार्यकारी संचालक

### * विशेष सूचना *

१) सभासदांनी सभेस व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे झुम ॲपवर वार्षिक सभेत सहभागी होण्यासाठी दि.२३/९/२०२१ पूर्वी https://kisanveeragm2122.ruha.co.in या संकेतस्थळावर आपले रजिस्ट्रेशन करावे व त्याच संकेत स्थळावर ऑनलाईन सभेकरिता उपस्थित रहावे.

२) सदर सभेच्यावेळी सभासदांना काही माहिती विचारावयाची असल्यास त्याबाबतची लेखी विचारणा गुरुवार दि.२३/९/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत कारखान्याचे कार्यालयाकडे पोस्टाने अगर समक्ष सादर करावी.

३) पुरेशा गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास विषयपत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचे विचारार्थ त्याच ठिकाणी गुरुवार दिनांक ७/१०/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता घेणेत येईल. पोटनियमातील तरतुदीनुसार अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) कारखान्याच्या सभासद असणाऱ्या सहकारी संस्थांनी अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन पध्दतीने हजर राहणेसाठी व कामकाजात सहभाग घेणेसाठी प्रतिनिधीचे नांव संस्थेच्या ठरावाच्या सत्यप्रतीसह कारखाना कार्यालयाकडे दि.२३/९/२०२१ पूर्वी पाठविण्यात यावे.

५) अहवाल नजरचुकीने न मिळाल्यास कारखान्याच्या शेती विभागाच्या गट ऑफिसमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.